# शेतक-यांच्या आत्महत्या : भावी पिढीचे शिक्षण - एक दूरगामी उपाययोजना

## - श्री. शांतीलाल मुथ्था (संस्थापक, बीजेएस)

या वर्षीचा महाराष्ट्रातील दुष्काळ तसा भीषणच आहे. २ वर्षांपूर्वी सुद्धा महाराष्ट्रामध्ये खूप भीषण दुष्काळ पडला होता. त्यावेळी सुद्धा पिण्याच्या पाण्यापासून खाण्यासाठी अन्न अशा सर्वच गोष्टींची टंचाई निर्माण झाली होती. या वर्षीच्या दुष्काळाचे वेगळेपण म्हणजे शेतक-यांच्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या आत्महत्या. मराठवाडा व विदर्भ या दोन्ही विभागात या वर्षी शेकडो शेतक-यांनी आत्महत्या केल्या व त्यामुळे फक्त आत्महत्या केलेल्या शेतक-यांचेच परिवार नव्हे तर संपूर्ण देशातीलच शेतकरी वर्गासमोर मोठे संकट उभे राहिलेले आहे. ज्यांनी आत्महत्या केलेल्या नाहीत त्यांचीही परिस्थिती खूपच बिकट आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. परंतु आत्महत्या करण्याच्या वाढत्या प्रमाणामुळे एकूणच या विषयाचे गांभीर्य फारच वाढत चालले आहे. सरकार व अनेक स्वयंसेवी संस्था आपापल्या परीने या संकटाला सामोरे जाण्याचा प्रयत्न करीतच आहेत. तसेच आपल्यापैकी प्रत्येकाने त्यासाठी काही योगदान देणे हे अत्यंत महत्वाचे आहे.

भारतीय जैन संघटना (बीजेएस) ही एक स्वयंसेवी संस्था नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनामध्ये ३० वर्षांपासून कार्यरत आहे. २०१३ च्या दुष्काळामध्ये बीजेएसने मराठवाड्यात विनाअनुदानित तत्वावर ३० ठिकाणी छावण्या उभारून १०००० जनावरांचे व्यवस्थापन केले होते. तसेच बीड जिल्हयातील ११५ तलावांचा गाळ पूर्णपणे काढून जिल्हयामध्ये एक विक्रम प्रस्थापित केला होता, त्याचा परिणाम म्हणजे जेव्हा २०१४ मध्ये चांगला पाउस झाला तेव्हा हे सर्व तलाव पूर्णपणे भरले होते. अशा प्रकारे बीजेएस दुष्काळामध्ये दूरदृष्टीने आप्पत्ती निवारण्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून करीतच आहे. जर हे काम झाले नसते तर कदाचित आज आणखी जास्त बिकट परिस्थिती दिसली असती.

यावर्षी आम्ही बीड, लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील, २०१५ सालामध्ये आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या ३२५ मुला-मुलींना (१९३ मुले व १३२ मुली) २० नोव्हेंबर २०१५ रोजी त्या-त्या जिल्हयातून पुणे येथे शिक्षणासाठी घेऊन जाणार आहोत. या विद्यार्थ्यांचे इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण, राहणे, भोजन, आरोग्य, मानसिक समुपदेशन, शालेय साहित्य इत्यादी संपूर्ण जबाबदारी घेऊन या मुलांचे शैक्षणिक पुनर्वसन करून त्यांची सर्वांगीण प्रगती घडवून आणणे हे या मागील उद्दिष्ट आहे.

बीजेएस सातत्याने प्रत्येक नैसर्गिक आपत्तीमध्ये दूरगामी व मोठी जबाबदारी आपले कर्तव्य म्हणून स्वतःवर घेत असते. १९९३ साली लातूर-उस्मानाबाद भूकंपातून १००० विद्यार्थ्यांना पुणे येथे आणून सातत्याने १० वर्षांपेक्षा जास्त त्या मुलांसाठी काम करून त्यांना फक्त शिक्षणच दिले नाही तर एक सक्षम नागरिक म्हणून घडविण्यामध्ये बीजेएस ला यश आले आहे. १९९७ च्या जबलपूर भूकंपातील मुले व २००५ च्या जम्मू-काश्मीर भूकंपातील मुले आम्ही शिक्षणासाठी पुण्यात वाघोली प्रकल्पात आणलेली आहेत. १९९७ सालापासून सातत्याने आजपर्यंत मेळघाटातील आदिवासी मुलांना इयत्ता ५ वी मध्ये प्रवेश दिला जातो व १२ वी पर्यंतचे त्यांचे शिक्षण वाघोली शैक्षणिक व पुनर्वसन केंद्रात होते.

या विद्यार्थ्यांचा निकाल तर १०० टक्के लागतोच, याशिवाय पुण्यातील विद्यार्थ्यांच्या बरोबरीला येऊन ८५-९० टक्केपर्यंत निकाल आणण्याची किमयाही हे आदिवासी विद्यार्थी करीत आहेत. अशा पद्धतीने आतापर्यंत ३००० विद्यार्थी या वसतीगृहातून शिक्षण पूर्ण करून गेलेले आहेत. हेच विद्यार्थी भविष्यकाळात समाज परिवर्तनाचे प्रवर्तक सिध्द होणार आहेत याची आम्हाला खात्री आहे. आजही लातूर-उस्मानाबाद येथील ह्याच माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील आत्महत्या केलेल्या कुटुंबाला भेटी देऊन त्यांची माहिती गोळा करून या सर्व कुटुंबांचे सांत्वन केले आहे.

आत्तापर्यंत आम्ही प्रत्येक आपत्तीमधून फक्त मुलांनाच पुण्याला आणले आहे. यावेळी मात्र आम्ही मुलांच्या बरोबरीने मुलींनाहि पुण्याला आणण्याचा निर्णय घेतला आहे. शेतक-यांच्या घरामध्ये पुन्हा आत्महत्या होऊ नये अशा प्रकारची मानसिकता घरा-घरामध्ये निर्माण करण्यासाठी मुलांबरोबर मुलींचाही सहभाग आम्हाला तितकाच महत्वाचा वाटतो. त्या दृष्टीनेच मुलींना आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आम्हाला खात्री आहे की ही मुले-मुली आमच्याकडे फक्त शिक्षणच घेणार नाहीत तर शेतक-यांच्या संपूर्ण जीवनशैलीवर प्रभाव टाकू शकतील व समाजामध्ये परिवर्तन करू शकतील अशा प्रकारची क्षमता यांच्यात निर्माण करण्याचा आमचा मानस आहे. या गोष्टी डोळ्यासमोर ठेऊन हा अतिशय महत्वपूर्ण निर्णय आम्ही घेतला आहे.

हा निर्णय घेण्यापूर्वी बीजेएसने या तीनही  जिल्ह्यातील ४२२ आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या घरामध्ये प्रत्यक्ष जाऊन, त्यांच्या परिवाराशी बोलून, शास्त्रोक्त पद्धतीने सर्व्हे केला आहे. हा सर्व्हे करण्यासाठी आम्ही पुण्यातील आमच्या पिंपरी व वाघोली येथील शाळा-कॉलेज मधील शिक्षिका तसेच बीड जिल्ह्यातील आमच्या मूल्यवर्धन प्रकल्पातील महिला शिक्षिकांनाच पाठविले होते. बीजेएसच्या या तीनही जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी या सर्व्हे करणाऱ्या महिलांना मोठ्या प्रमाणावर सहकार्य केले आहे. या प्रक्रियेत पुणे येथून श्री. सुरेश साळुंके व श्री अशोक पवार यांच्या नेतृत्वाखाली हा सर्वे करण्यात आला आहे. तसेच या तीन जिल्ह्यातील बीजेएसच्या श्री. राजेंद्र मुनोत, श्री. किशोर पगारिया(बीड), श्री. सुनील कोचेटा, श्री. किशोर जैन (लातूर), श्री. विजय बेदमुथ्था, श्री. सुनील डुंगरवाल (उस्मानाबाद) यांच्या नेतृत्वाखाली हजारो कार्यकर्त्यांनी या सर्व्हेमध्ये योगदान दिले आहे. या सर्व्हेचा वेगळा रिपोर्ट बीजेएसच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

---

प्रति,　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक : १६.११.२०१५

मा. संपादक,

सप्रेम नमस्कार,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये / मासिकामध्ये प्रसिद्धी द्यावी ही विनंती.

कळावे.

आपला स्नेहांकित,

**शांतीलाल मुथ्था**
**संस्थापक, बीजेएस**

**या रिपोर्टमधील खास वैशिष्टे खालीलप्रमाणे :**

१. या तीनही जिल्ह्यांतील ४२२ आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या परिवारांचा सर्व्हे करण्यात आला.

२. या तीनही जिल्ह्यामधून इयत्ता ५ वी ते १२ वी मध्ये शिक्षण घेणा-या १९३ मुले व १३२ मुली असे एकूण ३२५ विद्यार्थी आहेत. त्यापैकी २१३ मुला-मुलींच्या परिवारांनी सर्व्हे करीत असतानाच पुण्याला जाण्यासाठी संमती दिली.

३. या तीनही जिल्ह्यांत आत्महत्या केलेल्या शेतक-यांपैकी १८-२४ वयोगटातील संख्या ७ टक्के आहे, २५-३४ वयोगटातील संख्या २० टक्के आहे, ३५-४४ वयोगटातील संख्या २५ टक्के आहे. याचा अर्थ असा की आत्महत्या केलेल्या लोकांपैकी ५० टक्के पेक्षा जास्त लोक हे तरुण व मध्यमवयीन होते.

४. आत्महत्या केलेल्या कुटुंबातील शेतक-यांपैकी ७४ टक्के शेतक-यांकडे जिरायती जमीन आहे, ७ टक्के शेतक-यांकडे पडीक जमीन आहे, ५ टक्के शेतक-यांकडे जमीनच नाही व २ टक्के शेतक-यांकडे बागायती जमीन आहे. यावरून या जिल्ह्यांची ख-या अर्थाने एक वेगळीच परिस्थिती लक्षात येते.

५. आत्महत्या केलेल्या शेतक-यांपैकी ७६ टक्के शेतक-यांकडे २ हेक्टरच्या आत जमीन आहे. म्हणजेच एक तर पडीक जमीन व त्यातही ७६ टक्के लोक अल्पभूधारक.

६. ज्यांनी आत्महत्या केली त्यांच्यापैकी ४७ टक्के लोकांकडे एक लाखापर्यंत कर्ज होते, २८ टक्के लोकांकडे एक लाखापेक्षा जास्त कर्ज होते, १० टक्के लोकांकडे किती कर्ज आहे हे माहिती नाही असे सांगण्यात आले. यावरून ही परिस्थिती किती बिकट आहे हे लक्षात येते.

७. आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या ४२२ घरांमध्ये १८ वयोगटाच्या पुढचे १०७३ लोक आहेत. त्यापैकी २०६ लोकांची जिल्हा सोडून बाहेर नोकरीला जाण्याची तयारी आहे. त्यामध्ये १३० पुरुष व ७६ महिला आहेत. बाहेर नोकरीला जाणा-या लोकांचा २५-३४ वयोगटाचे २५ टक्के लोक आहेत व १८-२४ वयोगटाचे २१ टक्के लोक आहेत. त्यांच्या शिक्षणाबद्दलचीही सर्व माहिती या रिपोर्टमध्ये दिलेली आहे.

या तीनही जिल्ह्यातील जिल्हापातळीवरील शासकीय अधिका-यांकडून आत्महत्या केलेल्या शेतक-यांची यादी घेण्यात आली व त्याप्रमाणे सर्व्हे करण्यात आला. बीजेएसने केलेल्या या सर्व्हेसाठी महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा पातळीवरील अधिका-यांनी मोठ्या प्रमाणावर सहकार्य केले. बीजेएस त्यांचे आभारी आहे.